PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Pashchatap
Year: 1981

Song: Lakh Rabnarya Hata Lago
Lyricist: Madhukar Aarkade

लाख राबणाऱ्या हाता
लागो माझा हातभार
हो... लाख राबणाऱ्या हाता
लागो माझा हातभार
सृष्टी दयेचा उमाळा
सृष्टी दयेचा उमाळा
तिच कृपाळू उदार
तिच कृपाळू उदार
लाख राबणाऱ्या हाता
लागो माझा हातभार
हो... लाख राबणाऱ्या हाता
लागो माझा हातभार

दिसभरी कष्टणाऱ्या
घास ठेवी हातावर
दिसभरी कष्टणाऱ्या
घास ठेवी हातावर
करूणेचा तुझा झरा
त्यात मायेचा पाझर
तुझ्या कसाच्या मातीत
तुझ्या कसाच्या मातीत
घाम गळावा अपार
घाम गळावा अपार
लाख राबणाऱ्या हाता
लागो माझा हातभार
हो... लाख राबणाऱ्या हाता
लागो माझा हातभार

सहा ऋतूंचा सोहळा
कष्टकऱ्यांनी पहावा
सहा ऋतूंचा सोहळा
कष्टकऱ्यांनी पहावा
उभ्या भरल्या पिकात
तुला वाटते पहावा
उभ्या भरल्या पिकात
तुला वाटते पहावा
ऊन वाऱ्या पावसात
ऊन वाऱ्या पावसात
तुझी असावी पाखर
तुझी असावी पाखर
लाख राबणाऱ्या हाता
लागो माझा हातभार
हो... लाख राबणाऱ्या हाता
लागो माझा हातभार

ये... चला रे
देहामनाने थकल्या
मिळो विसावा मजुरा
देहामनाने थकल्या
मिळो विसावा मजुरा
हाका गोठल्या गळयात
गांजल्याच्या ऐक जरा
हाका गोठल्या गळयात
गांजल्याच्या ऐक जरा
नव्या भल्लवीची राया
नव्या भल्लवीची राया
ऐक ऐक रे पुकार
ऐक ऐक रे पुकार

Literacy for a Billion

लाख राबणाऱ्या हाता
लागो माझा हातभार
हो... लाख राबणाऱ्या हाता
लागो माझा हातभार
सृष्टी दयेचा उमाळा
सृष्टी दयेचा उमाळा
तिच कृपाळू उदार
तिच कृपाळू उदार

लाख राबणाऱ्या हाता
लागो माझा हातभार
हो... लाख राबणाऱ्या हाता
लागो माझा हातभार
लागो माझा हातभार
हो लागो माझा हातभार
हो लागो माझा हातभार

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*